



दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | बुधवार, 5 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 89 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com







# केजमध्ये शेकापचा वर्धापन दिन उत्साहात

## क्रांतिसिंह नाना पाटील व अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पुरस्कार वितरण सोहळा संपन्न; 'वारकरी संप्रदायाच्या नावाने हिंसा करणारा वारकरी असू शकत नाही' : माजी आमदार बाळाराम पाटील







**केज | वृत्त**

क्रांतिसिंह नाना पाटील आणि लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त केज येथील मुक्ताई सभागृहात भव्य पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दहा मान्यवरांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात माजी आमदार बाळाराम पाटील यांनी आपल्या भाषणात सामाजिक ऐक्याचा संदेश देत, "वारकरी संप्रदायाच्या नावाने हिंसा करण्याचे आवाहन करणारा व्यक्ती वारकरी असूच शकत नाही," असे स्पष्ट मत व्यक्त केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्व जाती-धर्मांनी एकत्र येऊन लढा दिला होता, मात्र आज समाजात द्वेषाचे वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. क्रांतिसिंह नाना पाटील आणि अण्णाभाऊ साठे यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे आवाहनही त्यांनी केले. शेकापच्या महिला प्रदेशाध्यक्षा तथा अलिबागच्या नगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी सरकारच्या स्मार्ट मीटर धोरणावर टीका करत, "स्मार्ट मीटरच्या नावाखाली शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांची आर्थिक लूट सुरू आहे," असा आरोप केला. सर्वसामान्यांवर आर्थिक भार टाकणाऱ्या निर्णयांना शेकापचा विरोध कायम राहील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी आमदार बाळाराम पाटील यांनी भूषविले, तर ध्वजारोहण ॲड. मानसी म्हात्रे यांच्या हस्ते झाले. उद्घाटन भाई रामदास जराते यांनी केले. यावेळी माजी आमदार ज्ञानोबा गायकवाड, राजेसाहेब देशमुख, भाई पोपटराव बोराडे, ॲड. नारायण गोले, भाई बापूसाहेब सोळुंके, कॉ. भाऊराव प्रभाळे, कॉ. पंकज चव्हाण, भाई बाळासाहेब धस, ॲड. अनिकेत देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते भाई मोहन गुंड यांच्या पक्षबांधणीतील योगदानाचा विशेष गौरव करण्यात आला. गेल्या २२ वर्षांपासून बीड जिल्ह्यात शेकापची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे सर्व वक्त्यांनी कौतुक केले. तसेच शेकाप महिला आघाडीची उभारणी अधिक मजबूत करण्यासाठी राज्यभर संघटन विस्ताराचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी कॉ. राजू देसले, संपादक गंमत भंडारी, ह.भ.प. अविनाश भारती, भाई संपत पवार, प्रा. डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रा. डॉ. मुकुंद राजपंखे, शाहीर तुकाराम ठोंबरे, स्वरूपा सुंदर नाईकवाडे, अनिता कांबळे आणि कॉ. बळवंत कदम यांना 'क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढविली. पुरस्कार स्वीकारताना सत्कारमूर्तींनी अशा सन्मानामुळे समाजकार्यात अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळते, अशी भावना व्यक्त केली.

कार्यक्रमास नागरिक, महिला आणि शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन हनुमंत घाडगे व डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले, तर जनार्दन सोनवणे यांनी सन्मानपत्रांचे वाचन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भाई अशोक रोडे, निखिल बचुटे, परमेश्वर सोळुंके, स्वप्नील धनवडे, दत्ता वाघमारे, महेश गायकवाड, मंगेश देशमुख यांच्यासह शेकापच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता धनंजय कोकाटे यांच्या कर्तृत्वाचा गौरव; ह.भ.प. रामेश्वर महाराज

## कोकाटे यांच्या मनोगताची चर्चा!; दैनिक 'अतुल्य महाराष्ट्र' मधील विशेष लेखाचे उपस्थित नागरिकांकडून कौतुक

**परळी | नितीन ढाकणे**

महानिर्मिती कंपनीचे अधीक्षक अभियंता धनंजय दिगंबर कोकाटे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त दैनिक अतुल्य महाराष्ट्र मध्ये प्रकाशित झालेल्या विशेष मनोगताची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी आपल्या मोठ्या बंधूंबद्दल व्यक्त केलेल्या भावना, त्यांचा सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेचा गौरव करणारा हा लेख वाचकांच्या विशेष पसंतीस उतरला आहे.

एका विशेष कार्यक्रमात ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी ही आकर्षक आणि भव्य फ्रेम उपस्थित मान्यवरांसमोर सादर केली. यामध्ये धनंजय कोकाटे यांच्या संपूर्ण सेवाप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला होता. कार्यक्रमात उपस्थित मान्यवर, वारकरी संप्रदायातील पदाधिकारी, अभियंता वर्ग तसेच नागरिकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

धनंजय कोकाटे यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणा, शिस्त, नम्रता आणि निःस्वार्थ सेवाभाव यांचा आदर्श निर्माण केला. अधीक्षक अभियंता या जबाबदारीच्या पदावर कार्यरत असताना त्यांनी सहकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांशी जपलेले स्नेहपूर्ण संबंध, त्यांची निर्णयक्षमता आणि माणुसकीची जपणूक यांचा विशेष उल्लेख या मनोगतात करण्यात आला आहे. ह.भ.प.



रामेश्वर महाराज कोकाटे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना, "कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव हीच धनंजय कोकाटे यांची खरी ओळख आहे. त्यांनी आयुष्यभर जपलेली माणुसकी हीच त्यांची सर्वात मोठी संपत्ती आहे," असे गौरवोद्गार काढले. या विशेष मनोगताची फ्रेम कार्यक्रमात आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत धनंजय कोकाटे यांच्या सेवा प्रवासाची कौतुक केले. सेवानिवृत्ती हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा शेवट नसून समाजसेवा, अध्यात्म आणि सामाजिक बांधिलकीच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली. धनंजय कोकाटे यांच्या प्रदीर्घ, निष्कलंक आणि प्रेरणादायी सेवेला मानवंदना देणारा हा उपक्रम समाजात कर्तव्यनिष्ठ अधिकाऱ्यांविषयीचा आदर अधिक दृढ करणारा ठरल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.



# कोल्हापूरच्या भव्य तैलिक समाज मेळाव्यासाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे; संगमेश्वर फुटके

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य तैलिक समाज मेळावा होणार आहे, या मेळाव्यास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष संगमेश्वर आप्पा फुटके यांनी केले आहे.

कोल्हापूर येथे २३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या तैलिक समाजाचा भव्य मेळावा होणार आहे. या ऐतिहासिक मेळाव्यास समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे यासाठी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा शिवसेना सांगली जिल्हाध्यक्ष (शिंदे गट) सन्माननीय संजय बापू विभुते परळी वैजनाथ येथे आले होते. बीड जिल्हाध्यक्ष संगमेश्वर आप्पा फुटके यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा सचिव प्रा. मधुकर शिंदे यांनी संजय बापू विभुते यांचे स्वागत केले. तर परळी तेली युवक संघटनेचे अध्यक्ष पवनजी फुटके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी समाजबांधवांना मार्गदर्शन करताना संजय बापू विभुते म्हणाले की, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने आणि संघटितपणे काम करणे ही काळाची गरज आहे. विशेषतः तरुणांनी सामाजिक कार्यासोबतच राजकारणातही सक्रिय सहभाग घेऊन समाजाच्या हितासाठी सक्षम आणि चांगले नेतृत्व निर्माण केले पाहिजे. कोल्हापूर येथे २३ ऑगस्ट रोजी होणारा भव्य समाज मेळावा हा समाजाच्या एकजुटीचे आणि संघटनशक्तीचे दर्शन घडविणारा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार असून, या मेळाव्यास बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.




# संपादकीय

## बैलाविना शेतीला मजा नाही!


रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.



# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा : प्रा. डॉ. बालाजी साबळे

**सिरसाळा (प्रतिनिधी)**:

श्री पंडितगुरु पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा येथील राष्ट्रीय सेवा योजना व समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने थोर स्वातंत्र्यसैनिक क्रांतिसिंह कॉ. नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंत जाधव हे होते.

प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. बालाजी साबळे यांनी आपल्या मार्गदर्शनात क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आणि संघर्षमय जीवनाचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. त्यांनी नाना पाटील यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात सक्रीय सहभाग घेत 'प्रतिसरकार' (पत्री सरकार) स्थापन करून ब्रिटिश सत्तेला प्रभावी आव्हान दिल्याचे सांगितले. त्यांनी सावकारी प्रथेला आळा घालण्यासाठी केलेले कार्य, अन्नधान्य पुरवठ्याची व्यवस्था, भूमिगत प्रशासनाची उभारणी तसेच सैनिकी दलाची स्थापना यांचा उल्लेख केला.




प्रा. साबळे यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा आणि महात्मा गांधी यांच्या कार्याचा नाना पाटील यांच्यावर झालेला प्रभाव अधोरेखित केला. विवाहप्रसंगी हुंडा व पुरोहित पद्धतीला नकार देत स्वतःचा विवाह करून त्यांनी सामाजिक सुधारणेचा आदर्श घालून दिला. पत्नीला शिक्षण देण्यामागील त्यांची पुरोगामी भूमिका आणि तलाठी पदाचा राजीनामा देऊन समाजकारणात उडी घेतल्याचा इतिहासही त्यांनी उलगडून सांगितला. स्वातंत्र्यानंतर कम्युनिस्ट पक्षात कार्य करत दक्षिण सातारा व बीड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केल्याची माहितीही त्यांनी दिली. मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी सामाजिक व शेतीविषयक प्रश्न सोडविण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. अनंत जाधव यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन करून जात, धर्म, पंथ आणि लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन समाजहितासाठी कार्य करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. शशिकांत परळकर यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयदीप सोळुंके यांनी केले. कार्यक्रमास प्रा. दयानंद झिंजुर्डे यांची विशेष उपस्थिती लाभली. आभार प्रदर्शन प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले. सदरील कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमानस

## मुलखांवेगळी माणस

## शेतमजुराचा पोस्ट तिकिटांचा संग्रह



प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्यात कोणता ना कोणता छंद जोपासत असतो. शहरी भागात लहानपणापासून मुलांना असे छंद जोपासायची सवय लागलेली असते. मात्र माढा तालुक्यातील लऊळसारख्या ग्रामीण भागातील एका शेतमजुराने जोपासलेला देशी-विदेशी पोस्टाच्या तिकिटांचा संग्रह खरंच कौतुकास्पद आहे. महादेव डांगे यांची माढा तालुक्यातील लऊळ येथे 22 गुंठे शेती आहे. घरची हलाखीची परिस्थिती असल्याने शाळकरी वयापासून मजुरीची सवय असलेले महादेव यांना चौथीमध्ये शिकत असताना पोस्टाच्या तिकिटाचे महत्व एका प्रसंगावरून समजले आणि तेव्हापासून त्यांना ही तिकिटे संग्रह करण्याचा नादच लागला. गेली 40 वर्षे महादेव यांनी हा छंद जपला जोपासलाच नाही, तर या तिकिटांसाठी आलेली लाखो रुपयांची ऑफर धुडकावून त्यांनी पुढच्या पिढीसाठी हा संग्रह जपून ठेवला आहे.महादेव डांगे यांचे कुटुंब लऊळ जवळील एका वस्तीवरील झोपडीत राहतात. वडिलोपार्जित 22 गुंठे शेतीत कुटुंबाचा चरितार्थ चालणे अवघड असल्याने मुलगा आणि महादेव हे दोघेही मजुरीचे काम करतात. महादेव हे चौथीमध्ये असताना त्यांना एक पोस्टाचे जुने तिकीट मिळाले होते. हे तिकीट त्यांच्याकडून एकाने दीड रुपायाला विकत घेतले आणि ही तिकिटं खूपच मौल्यवान असतात. याचा महादेव यांना साक्षात्कार झाला. मग लऊळसारख्या भागात राहूनही शाळकरी महादेव यांनी तिकिटं गोळा करण्यास सुरुवात केली. तरुणपणी कामासाठी महादेव पुण्यात स्थलांतरित झाले. इथे काम करताना अशी पुरातन तिकिटांच्या शोधातच असे.

पेंटिंगचे काम करताना पुणे आणि परिसरात लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवत त्यांच्याकडून मजुरी कमी मिळाली तरी घ्यायची, मात्र त्यांच्याकडे असलेल्या जुन्या पाकिटांवरील तिकिटे मात्र ते न लाजता मागून घेत. महादेव यांची ही आवड पाहून पुण्यातील कॅम्प परिसरात काम करताना, त्यांना अनेक विदेशी तिकिटे मिळाली. महादेव यांची आवड पाहून पुण्यातील एका निवृत्त अधिकाऱ्याने त्यांच्याजवळील काही जुनी तिकिटांचा संग्रह दिल्यावर आभाळाला गवसणी घातल्याचा आनंद महादेव याला झाला. काही दिवसातच






महादेव यांच्याकडे भारत, पाकिस्तान, इंग्लंड, फ्रांस, आफिका अशा अनेक देशातील पुरातन तिकिटांचा संग्रह तयार झाला. काही वर्षांपूर्वी त्याच्याकडील तिकिटांचा संग्रहाची माहिती घेऊन कोलकात्याच्या एका डॉक्टरने फोन करून सर्व तिकिटांचा संग्रह दोन कोटी रुपयांना मागितला होता. हातावर पोट असणाऱ्या कोणालाही ही रक्कम फारच मोठी असते, मात्र तरीही महादेव यांनी आपली जपलेली आवड विकण्यास नकार दिला.आज महादेव यांनी वयाची पन्नाशी गाठली आहे. गेली 40 वर्षे जपलेला आपला हा संग्रह शाळेतील विद्यार्थ्यांनी पाहावा याची माहिती घ्यावी हा त्यांचा उद्देश होता. आता ते पुन्हा आपल्या लऊळ या गावी येऊन पुन्हा आपल्या भागात मजुरी करू लागले आहेत. आता त्यांचा मुलगाही मजुरीला जातो, पण हे तिकिटांच्या संग्रहाचे त्यांचे वेड आजही तसेच आहे. आजही महादेव आणि त्यांच्या पत्नीने हा संग्रह झोपडीतील एका पेटाऱ्यात जपून ठेवला आहे. आपला संग्रह ग्रामीण भागातील मुलांनी पाहावा आणि त्यातून माहिती घ्यावी ही त्यांची इच्छा असली तरी आजच्या मोबाईलच्या जमान्यात महादेव यांच्या तिकिटांचा संग्रह या मुलांसाठी आजही आऊट ऑफ कव्हरेज आहे.

### चलती का नाम गाडी

टाटा मोटर्सच्या विक्रीत वार्षिक ३७% वाढ

टाटा मोटर्स लिमिटेडची जुलै २०२६ मधील देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील एकूण विक्री ३९,६४१ वाहने इतकी होती; जुलै २०२५ मधील २८,९५६ वाहनांच्या तुलनेत ही ३७% वार्षिक वाढ आहे.जुलै २०२६ मध्ये MH&ICV (मध्यम आणि जड व्यावसायिक वाहने) ची देशांतर्गत विक्री १५,४३५ वाहने होती, जी जुलै २०२५ मध्ये १२,३७८ वाहने होती (२५% वार्षिक वाढ).

जुलै २०२६ मध्ये MH&ICV ची देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विक्री १६,३६४ वाहने होती, जी जुलै २०२५ मध्ये १३,६६९ वाहने होती (२०% वार्षिक वाढ).१८० अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या टाटा समूहाचा भाग असलेली टाटा मोटर्स लिमिटेड ही युटिलिटी वाहने, पिक-अप्स, ट्रक्स आणि बसेसची भारतातील सर्वात मोठी आणि जागतिक स्तरावर प्रसिद्ध उत्पादक कंपनी आहे. व्यावसायिक वाहतूक क्षेत्रात आठ दशकांहून अधिक काळ नेतृत्व करणाऱ्या या कंपनीची ओळख तिच्या नाविन्यपूर्णता, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी आहे. त्यांची प्रगत पॉवरट्रेन्स, कनेक्टेड तंत्रज्ञान आणि 'इंटेलिजंट फ्लीट सोल्युशन्स' (वाहन ताफा व्यवस्थापन उपाय) विविध प्रकारच्या सेवांना उदा. 'लास्ट-माईल डिलिव्हरी'पासून ते सार्वजनिक वाहतुकीपर्यंत सक्षम करतात आणि त्याच वेळी देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देतात. 'बेटर ऑलवेज' (नेहमीच अधिक चांगले) या ब्रँड वचनानुसार, टाटा मोटर्स भविष्यासाठी सज्ज असे उपाय (सोल्युशन्स) प्रदान करते, ज्यामुळे ग्राहकांचा अनुभव सुधारतो आणि शाश्वत विकासाला चालना मिळते.

### ....असा लागला शोध शोध चपलेचा

चप्पल किंवा सँडलचा शोध कोणत्याही एका व्यक्तीने लावलेला नाही, तर मानवाने चालताना पायांचे रक्षण व्हावे म्हणून वेगवेगळ्या प्राचीन संस्कृतींमध्ये वेगवेगळ्या साहित्याचा वापर करून तिचा विकास केला. संशोधकांच्या मते सर्वात आधीच्या चपलांचे पुरावे इजिप्तमध्ये सापडतात. तिथे ताडाची पाने, झाडांची छाल आणि 'पपीरस' नावाच्या वनस्पतीपासून सँडल बनवले जात असत. अमेरिकेतील ओरेगन येथील फोर्ट रॉक गुहेत वनस्पतींच्या सालीपासून विणलेल्या अत्यंत प्राचीन चप्पलांचे अवशेष सापडले आहेत, जे हजारो वर्षे जुने आहेत. चीनमध्ये ४७०० ईसा पूर्व चमडे, कापूस आणि झाडांच्या धाग्यांपासून चपला बनवल्या गेल्या. ग्रीस व रोमन संस्कृतीत चप्पल हे सामाजिक दर्जाचे प्रतीक मानले जात होते. आपल्याकडे प्राचीन काळी लाकडाच्या खडावा वापरता असत. त्यानंतर अनेक वर्षांनी चामड्यापासून चपला बनू लागल्या.आणि आता आधुनिक काळात तर प्लास्टिक,रबर,फायबर अशा अनेक धातूपासून चप्पल बनविल्या जाऊ लागल्या आहेत.

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**

# पीओपी बंदीवर अंतिम निर्णयाची प्रतीक्षा, राज्य सरकारच्या भूमिकेवर न्यायालयाचे ताशेरे

मुंबई : पर्यावरणस्नेही सण-उत्सवांना प्रोत्साहन देण्याच्या पार्श्वभूमीवर प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणेशमूर्तींच्या वापरासंदर्भात राज्य सरकारच्या भूमिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्य सरकारने पीओपीवरील संपूर्ण बंदी टप्प्याटप्प्याने लागू करून पुढील तीन वर्षांत ती पूर्णतः अंमलात आणण्याचा प्रस्ताव न्यायालयासमोर मांडला. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी भूमिका स्पष्ट केली. गणेशोत्सवासारख्या मोठ्या सामाजिक-धार्मिक परंपरेत बदल घडवून आणण्यासाठी व्यापक जनजागृती आवश्यक असल्याने पीओपी बंदीसाठी किमान तीन वर्षांचा कालावधी लागेल, असे त्यांनी सांगितले. यंदाच्या वर्षीही गेल्या वर्षीचेच आदेश कायम ठेवावेत, अशी विनंती त्यांनी न्यायालयाकडे केली. यावेळी न्यायालयाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून पर्यावरणपूरक शाडू मातीच्या गणेशमूर्तींची स्थापना करण्याचे केलेले आवाहनही संदर्भित केले. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारची भूमिका त्या आवाहनाशी सुसंगत आहे का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. खंडपीठाने राज्य सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करताना, ''न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्देशांकडे वारंवार दुर्लक्ष करणे योग्य नाही. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने होणे गरजेचे आहे. भावी पिढ्यांसाठी आपण कोणता वारसा ठेवत आहोत, याचाही विचार व्हायला हवा,'' असे निरीक्षण नोंदवले. गेल्या वर्षी पीओपी वापरास दिलेली परवानगी ही अंतिम संधी असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते, याचीही न्यायालयाने आठवण करून दिली.

दरम्यान, पीओपी मूर्तिकार संघटनेच्यावतीने ज्येष्ठ वकील उदय वारुंजीकर यांनी पीओपीवरील बंदीला विरोध दर्शविताना काही मुद्दे न्यायालयासमोर मांडले. त्यांच्या मते, शाडू मातीच्या मूर्तींचे पाण्यात पूर्ण विघटन होत नाही आणि त्यामुळे जलाशयांच्या तळाशी गाळ साचतो. याउलट पीओपी मूर्तींचा विसर्जनानंतर पुनर्वापर करता येऊ शकतो. तसेच पीओपी हे विषारी असल्याचे शास्त्रीयदृष्ट्या सिद्ध झाल्याची नोंद नसल्याचा दावाही त्यांनी केला. मूर्तींना वापरण्यात येणाऱ्या रंगांमुळे होणाऱ्या प्रदूषणाकडेही त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या रंगांमुळे पर्यावरणावर परिणाम होत असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, या दाव्यांबाबत न्यायालयाने सादर करण्यात आलेल्या अभ्यास आणि दस्तावेजांच्या शास्त्रीय आधाराबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावर संबंधित अभ्यास काही विद्यार्थ्यांनी आणि खासगी संस्थांनी केल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. पीओपी तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांविरोधात दाखल करण्यात आलेल्या विविध याचिकांवरील सुनावणी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पीओपी मूर्तिकार संघटनेचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर या प्रकरणात योग्य ते आदेश जारी करण्यात येतील, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने सुनावणी बुधवारपर्यंत तहकूब केली.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत नेत्र तपासणी शिबिरासतील पात्र रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी अहिल्यानगरला रवाना

## नगरसेविका अश्विनी केंद्रे व युवा नेते राहुल केंद्रे यांच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रम ; दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण करणार



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकनेत्या ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे व युवा नेते राहुल रामचरण केंद्रे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत कॉम्प्युटरद्वारे नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या रुग्णांना आज अहिल्यानगर येथील आनंदऋषीजी नेत्रालयात शस्त्रक्रियेसाठी रवाना करण्यात आले.

नंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगर आणि अरिहंत जैन सेवाभावी संस्था, परळी वैजनाथ यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर, पद्मावती गल्ली येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. आधुनिक संगणकीय यंत्रणेद्वारे नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर मोतीबिंदू असलेल्या गरजू रुग्णांची निवड करण्यात आली असून त्यांच्यावर अल्पदरात शस्त्रक्रिया करून त्यांना आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, ज्येष्ठ नागरिक तसेच उपचारांपासून वंचित राहिलेल्या अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे नागरिकांनी कौतुक केले.

यावेळी युवा नेते राहुल रामचरण केंद्रे म्हणाले, "जनतेला दिलेला एक-एक शब्द पूर्ण करणार, एवढे मी माझ्या सर्व मायबाप जनतेला आश्वस्त करतो. समाजहिताचे आणि जनकल्याणाचे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविले जातील." ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात आल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नगरसेविका सौ. अश्विनी राहुल केंद्रे, युवा नेते राहुल रामचरण केंद्रे, कार्यकर्ते, पदाधिकारी तसेच अरिहंत जैन सेवाभावी संस्था आणि आनंदऋषीजी नेत्रालयाच्या वैद्यकीय पथकाने परिश्रम घेतले.




# महेश काका खाकाळ यांची भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी, तर रॉकी महाद्वार यांची पोलीस पाटीलपदी निवड

आष्टी प्रतिनिधी: युवा नेते महेश काका खाकाळ यांची भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल तसेच रॉकी विजय महाद्वार यांची मुर्शदपूर येथील पोलीस पाटीलपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील सामाजिक व सार्वजनिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. युवा नेतृत्वाला मिळालेली ही जबाबदारी आणि गावाच्या प्रशासकीय व्यवस्थेत मिळालेली महत्त्वाची भूमिका आहें. या सत्कार प्रसंगी सरपंच अशोक मुळे, राजूशेठ अग्रवाल, ऋषिकेश धस, ओम कानगुडे, ऋषि वीर , अभिषेक गळगटे तसेच माऊली प्रतिष्ठान व मित्रपरिवार, मुर्शदपूर यांची उपस्थिती होती.

# कै लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात नशा मूक्तची शपथ

**परळी |** लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयामध्ये राष्टीय सेवा योजना विभागाच्या वतीने विकसित भारत यूवा कनेक्ट २.० अंतर्गत नशा मुक्त भारत या साठी महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयं सेवकांना एन एस एस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विवेकानंद कवडे यांनी शपथ दिली.

विकसित भारत यूवा कनेक्ट कार्यक्रम अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी उत्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी संस्थेचे कोश्याध्यक्ष प्रा. प्रसादजी देशमुख, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, प्रा. डॉ. देशपांडे , प्रा डॉ गुट्टे , प्रा. डॉ. चव्हाण , प्रा. डॉ. दिग्रसकर , प्रा. डॉ. कुलकर्णी , राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. विवेकानंद कवडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# क्रीडा क्षेत्रात योगाचे वाढते महत्त्व; तंदुरुस्तीबरोबर मानसिक बळही मिळते योगाभ्यास : खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाचा प्रभावी मंत्र

**अंबाजोगाई |प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धात्मक क्रीडा क्षेत्रात केवळ ताकद आणि कौशल्य पुरेसे नसून शारीरिक तंदुरुस्तीबरोबर मानसिक स्थैर्यही तितकेच महत्त्वाचे मानले जाते. या दोन्ही गोष्टी साध्य करण्यासाठी योगाभ्यास अत्यंत प्रभावी ठरत असून, तो आधुनिक क्रीडा प्रशिक्षणाचा अविभाज्य भाग बनला आहे.

श्री. दत्ता माणिकराव देवकते, शारीरिक शिक्षण शिक्षक, जि. प. कन्या प्रशाला, अंबाजोगाई यांनी योगाभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करताना सांगितले की, नियमित योगाभ्यासामुळे खेळाडूंमध्ये शारीरिक क्षमता, मानसिक एकाग्रता, संतुलन आणि आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे प्रत्येक खेळाडूने आपल्या दैनंदिन सरावात योगाचा समावेश करणे आवश्यक आहे.

योगातील विविध आसनांमुळे शरीराला लवचिकता, ताकद आणि संतुलन प्राप्त होते. सूर्यनमस्कारामुळे संपूर्ण शरीराचा प्रभावी व्यायाम होतो, तर वृक्षासन, गरुडासन, भुजंगासन आणि धनुरासनामुळे स्नायू बळकट होऊन दुखापतीचे प्रमाण कमी होते.

अनुलोम-विलोम, कपालभाती यांसारख्या प्राणायामामुळे फुफ्फुसांची क्षमता आणि स्टॅमिना वाढतो. ध्यानामुळे एकाग्रता विकसित होते, तणाव कमी होतो आणि दडपणाच्या परिस्थितीतही योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण होते.

कठोर सरावानंतर शवासन व इतर रिलॅक्सेशन तंत्रांमुळे शरीराची रिकव्हरी जलद होते. त्यामुळे खेळाडू कमी वेळात पुन्हा सरावासाठी सज्ज होऊन उत्कृष्ट कामगिरी करू शकतो.

विराट कोहली, एम. एस. धोनी, पी. व्ही. सिंधू आणि नीरज चोप्रा यांसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडूदेखील नियमित योगाभ्यास करतात. त्यामुळेच आधुनिक क्रीडा प्रशिक्षणात योगाला विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

# गांधी महाविद्यालय, कडा येथे पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमास मान्यता

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा संचलित श्रीमती एस. के. गांधी कला, अमोलक विज्ञान आणि पी.एच. गांधी वाणिज्य महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्रास वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका शिक्षणक्रमास नुकतीच विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे. महाविद्यालयात मुक्त विद्यापीठाचे एकूण १९ विविध शिक्षणक्रम सुरू असून, महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमधील विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेत आहेत. विद्यापीठाच्या "ज्ञानगंगा घरोघरी" या ब्रीदवाक्यानुसार हे अभ्यासकेंद्र कार्यरत असून, नव्याने मंजूर झालेला पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी विशेष उपयुक्त ठरणार आहे. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी खालीलपैकी कोणतीही पात्रता आवश्यक आहे —

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा वृत्तपत्रिका प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण, पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण, इयत्ता बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण, १९७५ पूर्वीची अकरावी (माध्यमिक शालांत) परीक्षा उत्तीर्ण, किंवा एसएससीनंतर किमान दोन वर्षांचा शासनमान्य पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे.

या अभ्यासकेंद्राच्या यशस्वी वाटचालीसाठी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व संचालक मंडळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जवाहरलाल भंडारी आणि अभ्यासकेंद्राचे केंद्रसंयोजक प्रा. डॉ. अशोक कोरडे यांच्या अथक परिश्रमांमुळे हा अभ्यासक्रम सुरू होणे शक्य झाले आहे.ग्रामीण भागात पत्रकारिता अभ्यासक्रम उपलब्ध झाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या अभ्यासक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी केंद्रसंयोजक प्रा. डॉ. अशोक कोरडे तसेच तंत्र सहाय्यक ज्ञानेश्वर खंदारे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# सावधान ! राज्यासह देशात अतीवृष्टीचे रौद्ररूप पहाता ; संभाव्य दुर्घटनांपासुन स्वत :ला सांभाळा

सध्याच्या परिस्थितीत देशातील बहुतांश राज्यांमध्ये अतीवृष्टीमुळे अनेक ग्रामीण भाग,शहरी भाग व अती दुर्गम भाग जलमग्न झाल्याचे दिसून येते सोबतच मानवीय,वित्तीय व पशुंची हाणी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकरीता प्रत्येकांनी सावधगिरीचे उपाय म्हणून नदी-नाले,तलाव,डोह,रोडचे खड्डे व रोडची वळणे यापासून सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.देशात सध्याच्या परिस्थितीत एक-दोन दिवस एकसारखा पाऊस आला की, संपूर्ण परिसर जलमग्न होतो आणि त्याचे दुष्परिणाम मानव,पशुपक्षी व वित्तीय हाणीच्या रूपात सर्वांनाच भोगावे लागते.याचे मुख्य कारण म्हणजे देशातील मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड होय. आज जंगलतोडीमुळे हवामानात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते याचा परिणाम निसर्गावर तर होतच आहे.परंतु मानवाच्या आरोग्यावर सुध्दा मोठा आघात करीत आहे.त्यामुळे देशात वाढती ढगफुटी, सुनामी,भुकंप,अती पाऊस,अती उष्णता इत्यादी अनेक नैसर्गिक आपदांचा सामना संपूर्ण जीवसृष्टीला करावा लागतो आहे.कारण वाढते सिमेंट रोड,शहरीकरण,औद्योगिकरण इत्यादींमुळे अनेक कारणांमुळे गावखेडे नष्ट होत आहेत.आज प्रत्येक शहराच्या केंद्रस्थानापासुन २० किलोमीटरपर्यंत शहराचे जाळे पसरल्याचे दिसून येते.यामुळे पाऊसाचे पाणी जमिनीत न जाता सरळ नदी-नाल्यांना,तलाव,धरण यांना जाऊन मिळते व अशा परिस्थितीत सर्वत्र पुरपरिस्थिती निर्माण झालेली दिसून. त्याचप्रमाणे शहरी भागात सिमेंट रोड झाले खरे पण ड्रेनेज सिस्टीमचा अभाव असल्याने राज्यासह देशातील अनेक शहर जलमग्न होतांना दिसतात व शहरात पुरपरिस्थिती निर्माण होते. असे अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत आणि त्याचे परिणाम भोगत सुध्दा आहोत.कारण देशातील अनेक राज्यात पावसाचे थैमान;पूर-भूस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. आताही महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली जात आहे यामुळे ७ जिल्ह्यात पावसाचा येलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.नुकत्याच झालेल्या विदर्भातील तुफान पावसामुळे सहा जणांचा मृत्यू झाला. यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा-लोणी मार्गावरील कुपटी नदीच्या पुलावरून कार वाहून गेल्याने आईसह दोन मुलींचा मृत्यू झाला.भंडारा आणि वर्ध्यात प्रत्येकी एक वाहून गेल्याने दगावले, बुलढाण्यात भिंत कोसळून महिला दगावली, भिवंडी शहरातील भोईवाडा गंगारामवाडी परिसरातील "कोहिनूर"ही धोकादायक इमारत कागदी पत्याच्या बंगल्यासारखी गुरुवारी रात्री कोसळून झालेल्या भीषण दुर्घटनेत १० लोकांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे राज्यात अती पावसामुळे आतापर्यंत ७६ जणांचा मृत्यू झाला तर ८१ जण गंभीर जखमी झाल्याचे सांगितले जाते.म्हणजे आपण ज्याप्रमाणे निसर्गावर अत्याचार करीत आहोत त्याच्या दुप्पट तो पावसाच्या रूपात रौद्र रूप धारण करून संपूर्ण सृष्टीवर घणाघाती प्रहार करीत आहे आणि याला दोषी आपणच म्हणजे संपूर्ण मानवजाती आहे.आज वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात केल्याचे सांगितले जाते.परंतु ८० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असल्याचे दिसून येते.कारण आपण हजारो एकर जमीनीवरील वृक्ष कटाई केली आणि त्याठिकाणी उद्योग धंदे, शहरीकरण,खाणी, औद्योगीकरण,रस्त्यांचे जाळे विणले मग वृक्षारोपण कुठे केले?जर वृक्षारोपण केले तर पाणी जमिनीत का मुरत नाही याचाही अभ्यास सरकारने करायला हवा.राजकीय पुढारी एक वृक्ष लावते आणि फोटो काढून मिडिया समोर फोटोसेशन करते ही कसली वृक्षलागवड म्हणायची!याला वृक्षलागवड म्हणता येणार नाही तर हा फक्त ड्रामा म्हणावा लागेल. आजही राज्यासह देशातील अनेक भागात बंजार जमीन किंवा पडीत जमीन आहे.त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायलाच पाहिजे आणि त्या वृक्षांची जोपासना सुध्दा व्हायला पाहिजे.तेव्हा अती पाऊसाचा ओघ थांबविता येईल असे मला वाटते.कारण राज्यासह देशात युध्दपातळीवर वृक्षलागवड झाली नाही तर येणाऱ्या काळात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भुकंपा सारखे महाभयंकर प्रकार रौद्ररूप धारण करून मोठ्या प्रमाणात मानवी, वित्तीय व पशुपक्षांची हाणी पोहचवू शकते यालाही नाकारता येत नाही.अती पावसामुळे दऱ्याखोऱ्यात, ग्रामीण भागात,अती दुर्गम भागात विषेली साप निघतात अशीच घटना ठाण्यामध्ये ग्रामीण भागात घडली गावापासून मुख्य रस्त्याला लागण्यासाठी पक्का रस्ताच नसल्याने डोली करून दऱ्याखोऱ्यांतून पायवाटेने ५ कि.मी. वरील रूग्णालयात डोलीतून घेऊन जातांना चौथीत शिकणाऱ्या ९ वर्षीय मुलाचा झोपेत साप चावल्याने दुर्दैवी मृत्यू झाला अशा भयावह घटना अती पाऊसामुळे होत आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसानंतर शनिवारी पावसाचा जोर काहीसा कमी झाला.मात्र गेल्या दोन-तीन दिवसांत घाटमाथा, कोकण, पुणे, सातारा, नाशिक,मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत जोरदार पाऊसाने सर्वत्र तारांबळ उडाली. आता पाऊस जरी ओसरला असला तरी १५ तारखेनंतर पाऊसाचा जोर जास्त वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे त्यामुळे सर्वांनीच नदी-नाले,तलाव, धरणे,डोह, दऱ्याखोऱ्यापासुन सावध रहाने गरजेचे आहे.हवामान खात्याने असेही वर्तवले आहे की,पुढील चार दिवसाकरीता विदर्भासह महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाच्या बाबतीत रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे म्हणजे अती पाऊसाचा धोका अजुन पर्यंत टळलेला नाही.देशात अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झाले आहे.यात उत्तराखंड, छत्तीसगड,केरळ, कर्नाटक, ओदिशा, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, बिहार व राजस्थानमध्ये पावसामुळे विविध दुर्घटना घडल्या आहेत.राज्यासह देशात अती पावसामुळे होणाऱ्या दुर्घटना लक्षात घेता संपूर्ण राज्य सरकारांनी सर्वप्रथम रोडच्या खड्ड्यांची दुरूस्ती ताबडतोब करावी व दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक रोडच्या वळणावर आवश्यक ते बोर्ड लावावे व डेंजर झोनच्या ठिकाणी सुरक्षा कर्मचारी तैनात केले पाहिजे.त्याचप्रमाणे वाढत्या पावसाचे प्रमाण पहाता नागरिकांनी व युवकांनी नदी-नाले,तलाव,डोह,धरण व विजांचा लखलखाट यापासून सावधगिरी बाळगली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता सेल्फीचा क्रेझ पहाता सेल्फी पॉइंटपासुन सावधगिरी बाळगावी अन्यथा सेल्फीचा क्रेझ महागात पडू शकतो.जय हिंद.



**– लेखक : रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार )**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, बुधवार, 5 ऑगस्ट 2026

# महाआरोग्य शिबिरामध्ये विक्रमी संख्येने रुग्णांवर उपचार होणार

## प्रसिद्ध डॉक्टर्स येणार असल्यामुळे रुग्णांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा : आ.सुरेश धस यांचे आवाहन

**आष्टी ( प्रतिनिधी )**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित महाआरोग्य शिबिराचा उद्या समारोप होणार असून त्यासाठी सौ अमृता फडणवीस वहिनी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि धर्मदाय मदत कक्ष यांच्या साह्याने होणाऱ्या या मोफत महाआरोग्य शिबिरा मध्ये उपचार घेण्यासाठी आष्टी पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यासह इतर भागातील सुमारे 35 ते 40 हजार रुग्णांची नोंदणी झाली असून उद्या आणखी रुग्ण येणार असल्याने हे महाआरोग्य शिबिर ऐतिहासिक होणार आहे या महाआरोग्य शिबिरामध्ये प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ पद्मभूषण डॉक्टर रमाकांत पांडा, प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने, यांच्यासह अनेक मान्यवर डॉक्टर उपस्थित राहणार असल्यामुळे या शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे यामहा आरोग्य शिबिराच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेमध्ये हे बोलत होते ते पुढे म्हणाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवस निमित्ताने आयोजित या महाआरोग्य शिबिरामध्ये गोरगरीब रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येणार असून त्यामध्ये कर्करोग हृदयरोग किडनी ना दुरुस्त गुडघे मणके डोळ्यांची तपासणी वृद्धांना आधारासाठी काठी देण्यात येणार आहे नादुरुस्त अशा सर्व आजारांवर उपचार करण्यात येणार आहेत विविध रोग प्रकारच्या रुग्णांची संख्या 35 ते 40, अशी असून त्यातील 15000 रुग्णांवर पुढील उपचार करावे लागणार आहेत आष्टी पाटोदा आणि शिरूर मतदार संघातील बहुतांश मजुरी करणारे ऊस तोडणी कामगार हमाली काम करणारे अशा प्रकारच्या रुग्णांवर मणके गुडघेदुखी कंबर दुखी डोळ्यांचे तपासणी आणि नंबरचा चष्मा देण्यात येणार आहे अशा प्रकारचे व्याधी जडलेले आहेत या सर्व रुग्णांवर मोफत उपचार करण्यात येणार असून महाराष्ट्र राज्यातील अत्यंत नामांकित मुंबई येथील हृदयरोग तज्ज्ञ पद्मभूषण डॉक्टर रमाकांत पांडा, मुंबई प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ पद्मश्री डॉक्टर तात्याराव लहाने मुंबई, प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टर पद्मश्री शेखर भोजराज, पद्मश्री डॉक्टर मधुसूदन अग्रवाल यांचे सह प्रसिद्ध डॉक्टर शैलेश पुणतांबेकर पुणे प्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉक्टर अमेय ठाकूर पुणे, संजीव ठाकूर पुणे, प्रसिद्ध हृदय शल्य चिकित्सक डॉक्टर रणजीत जगताप पुणे, त्याचबरोबर अहिल्यानगर



संभाजीनगर बीड येथील प्रमुख रुग्णालयांचे डॉक्टर उपलब्ध असणार आहेत अनिशा ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या मैदानात तीस हजार स्क्वेअर फुटाचा मंडप उभारण्यात आला असेल 270 तपासणी कक्ष तयार करण्यात आले आहेत वयोवृद्धांसाठी वीस हजार आधार काठी देण्यात येणार असून त्याचे वाटप देखील होणार आहे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिन निमित्ताने दिनांक 22 जुलै 20 26 ते 21 जुलै 27 पर्यंत हा आरोग्याचा महायज्ञ सुरू राहणार असून आरोग्य शिबिरामध्ये पुढील उपचारासाठी पाठवण्यात येणाऱ्या रुग्णांवर वर्षभर उपचार करण्यात येणार आहेत असेही त्यांनी शेवटी सांगितले त्यामुळे वाडी वस्ती गावातून रुग्णांना तपासणीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी आणून समाजसेवेच्या या महा यज्ञामध्ये सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी शेवटी केले आहे.

# १० ऑगस्टच्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर परळीत एलईडी जनजागृती व्हॅनचे उद्घाटन



**परळी/ प्रतिनिधी**

अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ, ब, क, ड) विरोधात १० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर जनजागृतीसाठी एलईडी व्हॅनचे उद्घाटन आज दिनांक 4 ऑगस्ट 2026 रोजी परळी शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात करण्यात आले.

या एलईडी व्हॅनच्या माध्यमातून अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या निर्णयाविरोधातील भूमिका, मोर्चाचे उद्दिष्ट तसेच समाजबांधवांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. शहरासह ग्रामीण भागात ही व्हॅन फिरून जनजागृती करणार असल्याची माहिती मिळते आहे.

यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. १० ऑगस्ट रोजी होणारा मोर्चा ऐतिहासिक आणि व्यापक स्वरूपाचा करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# स्मृतीशेष उषा शामराव ढाकणे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त अभिवादन





**परळी | प्रतिनिधी**

स्मृतीशेष उषा शामराव ढाकणे यांच्या प्रथम वर्षश्राद्धानिमित्त अभिवादन व स्मरण कार्यक्रम सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी परळी येथील अक्षदा मंगल कार्यालयात अत्यंत श्रद्धापूर्वक व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. त्या द वैद्यनाथ अर्बन कोआपरेटिव बँकेच्या माजी संचालिका होत्या. तसेच इनर व्हील व इतर सामाजिक संगठना मधे स्मृतीशेष उषाताई ढाकणे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. त्यांच्या प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ, स्नेहशील आणि सेवाभावी व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा देत उपस्थितांनी त्यांच्याप्रती कृतज्ञ भावना व्यक्त केल्या.

विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. राजकारणी, उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर, विविध व्यावसायिक, आप्तेष्ट यांनी उपस्थित राहून उषाताईंच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन केले. हितचिंतक आणि समस्त ढाकणे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिवादन प्रसंगी उपस्थितांनी स्मृतीशेष उषाताईंच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करून सदगती प्राप्त होऊन चिरशांती लाभावी, अशी प्रार्थना केली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शांत, भावनिक आणि श्रद्धामय वातावरणात पार पडला.

# स्व. अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यातील पहिल्या पुतळा उभारणीच्या कामाला वेग

## जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक; विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यातील पहिल्या पूर्णाकृती पुतळ्याची उभारणी परळी शहरात करण्यात येणार असून, या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला आता वेग आला आहे. पुतळा उभारणीसंदर्भातील विविध, तांत्रिक मान्यता व प्रशासकीय बाबींचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला संबंधित विभागांचे अधिकारी, परळीचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, तसेच सप्तश्रृंगी दुर्गा उत्सव सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा पदाधिकारी उपस्थित



होते. बैठकीत पुतळा उभारणीसाठी आवश्यक असलेली जागा, तांत्रिक बाबी, प्रशासकीय प्रक्रिया आणि इतर आवश्यक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पुतळा उभारणीसंदर्भातील सर्व बारकावे अधिकाऱ्यांसमोर मांडण्यात आले. शासन स्तरावर या कामाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून येत्या काही महिन्यांत परळी शहरात स्व. अजितदादा पवार यांचा पूर्णाकृती पुतळा



उभारण्याचे नियोजन असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या बैठकीस सप्तश्रृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेचे संचालक गौतम आगळे तसेच संस्थेचे इतर पदाधिकारी आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते.

परळी शहरात उभारला जाणारा हा पुतळा स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याची आठवण जपणारा आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी स्मारक ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.